# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

सप्टेंबर - डिसेंबर २००८ वर्ष १ अंक २ पृष्ठे ८ रु. २/-



नदीच्या काठावर एक वृक्ष आहे, आणि कित्येक आठवडे, दिवसामागून दिवस सूर्योदयाच्या वेळी आम्ही तो पाहत आहोत. झाडांच्या माथ्यांवरून, जेव्हा हळूहळू सूर्य क्षितिजावर येऊ लागतो तेव्हा हा वृक्ष अकस्मात सोनेरी होतो. त्याची सर्व पानं चैतन्याने तेजोमय होतात आणि तुम्ही त्याला पाहत असताना समय जात असतो, तो वृक्ष-त्याच्या नावाला महत्व नाही - महत्व आहे ते त्या सुंदर वृक्षाला - एक असाधारण स्वरूप, सबंध भूमीवर, नदीच्या पात्रावर पसरत असते आणि सूर्य जसा आणखी थोडा वर येऊ लागतो, तशी झाडाची पानं कंपायमान होतात, नाचू लागतात. प्रत्येक जाणारी घटका त्या झाडाला नवं स्वरूप देत असल्याचा भास होतो. सूर्योदयापूर्वी त्या वृक्षाच्या ठिकाणी गंभीर, शांत, दूरस्थ, भारदस्तपणाचा भाव असतो, आणि दिवस सुरू झाल्यावर प्रकाशात उजळून निघालेली त्याची पानं डोलू लागतात, नाचू लागतात आणि अतिशय सुंदर असल्याची विशिष्ट भावना त्या झाडावर दिसू लागते. दुपार होऊ लागली की त्याची छाया गडद होऊ लागते, आणि उन्हापासून संरक्षण मिळवण्यासाठी तुम्ही तिथे बसू शकता. मग तिथे तो वृक्ष सोबत्याप्रमाणे असल्यानं तुम्हाला एकटेपणा जाणवत नाही. तुम्ही तिथे बसलेले असताना झाडांनाच केवळ परिचित असलेलं सखोल, शाश्वत सुरक्षिततेचं आणि मुक्तपणाचं नातं उदयाला येतं.

संध्याकाळी जेव्हा पश्चिमा मावळत्या सूर्याच्या प्रकाशाने उजळू लागते तेव्हा त्या वृक्षाला काळोख, गांभीर्य हळूहळू घेरू लागतात. नंतर आकाशात लाल, पिवळ्या, हिरव्या छटा दिसू लागतात पण तो वृक्ष मात्र स्तब्ध, दृष्टिआड होऊन रात्रीची विश्रांती घेऊ लागतो.

तुम्ही जर त्या वृक्षाशी नातं जोडू शकलात तर तुमचं मानवजातीशी नातं जुळलेलं असतं. त्या वृक्षाला, म्हणून जगातील सर्व वृक्षांना, तुम्ही जबाबदार आहात. परंतु या पृथ्वीतलावरील जिवंत गोष्टींशी तुमचा संबंध नसेल तर मानवतेशी, माणसांशी तुमचा जो काही थोडाफार संबंध असतो तोही तुम्ही गमावून बसाल. एखाद्या वृक्षाच्या गुणवत्तेकडे आपण गंभीरपणे लक्ष देत नसतो, आपण त्याला खऱ्या अर्थाने कधी स्पर्श करीत नसतो, त्याचा भरीव आकार, त्याची ओबडधोबड साल हात लावून कधी पाहत नसतो, वृक्षाचा म्हणून एक नाद असतो तोही ऐकत नसतो. हा वृक्षाचा नाद म्हणजे त्याच्या पानांतून सळसळत जाणाऱ्या वाऱ्याचा नाद नव्हे. पानं फडफडवणाऱ्या सकाळच्या वाऱ्याचाही तो आवाज नव्हे. तो नाद म्हणजे वृक्षाचा स्वत:चा, त्याच्या बुंध्याचा आणि त्याच्या मुळांचा नीरव, नि:शब्द नाद असतो. तो नाद ऐकण्यासाठी तुम्ही विलक्षण संवेदनशील असायला पाहिजे. तो नाद म्हणजे जगात चाललेल्या गोंगाटाचा आवाज नव्हे, किंवा मनाच्या अखंडपणे चाललेल्या वटवटीचाही आवाज नव्हे, किंवा माणसामाणसांमधील संघर्षाचा- किंवा त्यांच्यामधील रानटी युद्धांचाही आवाज नव्हे, तर तो नाद, जो विश्वाचाच एक भाग असतो.

निसर्गाशी, कीटकांशी, उड्या मारत जाणाऱ्या बेडकांशी, टेकड्यांमध्ये आपल्या सहचराला साद घालणाऱ्या घुबडाशी आपला किती कमी संबंध येतो हे कसं विचित्र वाटतं. पृथ्वीवरील सर्व जिवंत गोष्टींविषयी आपल्याला आस्था असल्याचं दिसत नाही. आपण जर निसर्गाशी सखोल, कायमचा संबंध जुळवू शकलो तर आपल्या भुकेसाठी एखाद्या प्राण्याची हत्या कदापी करणार नाही. एखाद्या माकडाला, कुत्र्याला, गिनीपिगला आपल्या फायद्यासाठी आपण कधीही इजा करणार नाही. त्यांची चिरफाड करणार नाही. आपल्या जखमा, आपल्या शारीरिक इजा बऱ्या करण्यासाठी आपण दुसरे मार्ग शोधून काढू, पण मानसिक जखमा भरून काढणं ही एक संपूर्णपणे निराळी गोष्ट आहे. तुम्ही जर निसर्गाशी, त्या नारिंगाच्या झाडाशी आणि सिमेंटच्या जमिनीतून डोकं वर काढणाऱ्या गवताच्या पात्याशी, ढगांनी आच्छादलेल्या टेकड्यांशी नातं जोडलंत तर मानसिक जखमा हळूहळू भरून येऊ लागतील.

ही काही भावविवश किंवा स्वप्नरंजनात्मक कल्पना नव्हे, तर पृथ्वीवरील जिवंत आणि संचार करणाऱ्या प्रत्येक वस्तूशी असलेल्या संबंधामधील ती वास्तवता, सत्यस्थिती आहे. माणसाने कोट्यवधी व्हेल प्राणी ठार केलेले आहेत आणि अजूनही ठार करणं चाललेलं आहे. त्यांच्या कत्तलीद्वारे आपल्याला जे काही मिळतं ते सारं दुसऱ्या मार्गांनी, साधनांनी मिळवता येणं शक्य आहे. पण, सकृत्दर्शनी, माणसाला चपळ हरिणांची, सुंदर काळविटांची आणि विशालकाय हत्तींची हत्या करण्याची आवडच दिसते. एकमेकांची हत्या करण्याची आपल्याला आवड आहे. या पृथ्वीवर, मानवी जीवनाच्या इतिहासात माणसाची हत्या कधीच थांबली नाही. आपल्याला निसर्गाशी, प्रत्यक्ष झाडांशी, झुडपांशी, फुलांशी, गवताशी आणि जलदगतीने पळणाऱ्या मेघांशी दाट, गाढ संबंध प्रस्थापित करणं शक्य झालं आणि तसं आपण केलंच पाहिजे, तरच आपण कसल्याही सबबीवर कधीही दुसऱ्या माणसाची कत्तल करणार नाही. युद्ध म्हणजे संघटित हत्याच असते आणि आपण जरी एखाद्या विशिष्ट युद्धाच्या विरोधात निदर्शनं केली तर एकूणच युद्धविरोधी निदर्शनं आपण कधीच केलेली नाहीत. आपण असं कधीच म्हणालो नाही की दुसऱ्या माणसाला मारणं हे पृथ्वीवरील सर्वात मोठं पाप आहे.

*ओहाय, कॅलिफोर्निया फेब्रुवारी २५, १९८३*

# संपादकीय

परस्पर संबंध हा आपल्या अस्तित्वाचा एक महत्त्वाचा धागा आहे. ह्या विश्वातील वस्तुमात्रात एकमेकांमध्ये कुठेतरी, काहीतरी संबंध असतात. त्यावर स्थिती, अस्तित्व अवलंबून असते. विश्वाचे रहाटगाडगे त्यावर चालते. सूर्याचे ग्रहांशी नाते, समुद्राच्या भरती-ओहोटीशी चंद्राचे नाते, नदीचे डोंगर-समुद्राशी नाते, झाडाचे मातीशी नाते.

आपण ह्या संबंधांबद्दल नाही बोलत आहोत. प्राणी जीवनात त्या संबंधांना निराळे रूप आहे. प्राणी जोडीने, कळपाने राहतात. त्यात संबंध असतात. त्या संबंधांमध्ये सुरक्षितता, प्रजननाचा वगैरे भाग असतो. त्यात संघर्ष, माया, काळजी पण दिसतात. त्याला आपण नैसर्गिक व प्राणीमात्रांचा स्वभावधर्म म्हणतो.

परंतु 'स्व'भान असलेल्या मानवामध्ये आपण हे संबंध पहातो तेव्हा त्याचे स्वरूप फारच वेगळे होते. प्राणी जीवनातून आपल्यामध्ये आलेल्या त्या निरागस संबंधांच्या धाग्याला आपण वेगळाच पीळ देतो. प्राणीमात्रांमध्ये ते संबंध वास्तविक व मर्यादित सुखसोयींवर अवलंबून असलेले दिसतात, मानवामध्ये ते कृत्रिम, प्रदूषित, कलुषित होत जातात. त्यामध्ये विचारांचे वर्चस्व येते आणि निरागस, स्वाभाविक सुलभता अदृश्य होत जाते.

परस्पर संबंधाशिवाय आपण जगू शकत नाही. मग तो संन्यासी असो, संसारी, उद्योगपती, कामगार, बुद्धीमान किंवा सामान्य माणूस, कोणीही असो. संबंध हा जीवनाचा पाया आहे. हा पाया जेव्हा शुद्ध नसतो तेव्हा व्यक्तीचे जीवन व पर्यायाने मानवी जीवन हे ढळलेल्या पायावर उभे असते व ते संबंध केव्हा कोसळतील ह्याचा भरवसा नसतो.

कृष्णमूर्ती जेव्हा म्हणतात की संबंध सुखावर अवलंबून असतात, तेव्हा ती आपल्यासाठी गंभीरपणे पडताळून पहायची गोष्ट आहे. पती-पत्नी, आई-बाप, मुले, भावंडे त्या जिव्हाळ्याच्या असलेल्या संबंधांमध्ये सुद्धा खोलवर लपलेली सुखाची लालसा आहे हे कबूल करणे आपल्याला खरोखर कठीण आहे. त्याला प्रमुख कारण म्हणजे आपण स्वत:कडे प्रत्यक्ष, खोलवर पाहू शकत नाही आणि जेव्हा तसा प्रयत्न करतो तेव्हा त्या प्रयत्नांना पूर्ण उर्जा देत नाही. त्या मागील सत्य पाहण्याची आपल्या मनाची तयारी नसते. एका छपराखाली राहणारी माणसे, एका जमातीतील माणसे, एका ध्येयाने प्रेरित झालेली माणसे आपसात संबंध असल्याच्या भ्रमात राहतात. पण खरे पहाता ते आपापल्या इच्छा, सुख, अहंभाव या मागे धावत असतात. त्यात खऱ्या संबंधांना क्वचितच वाव असतो.

कृष्णमूर्ती परखडपणे हे सत्य दाखवितात व ते प्रत्यक्ष पाहण्याचे आपल्याला आव्हान करतात.

संबंध हा शब्द आपण सहजपणे वापरतो. कृष्णमूर्ती गांभीर्याने त्या संबंधाचे आयुष्यातील महत्त्व दाखवतात.

त्यांनी दर्शविलेल्या त्या परस्परसंबंधातील सत्य त्यांच्या वेचक उताऱ्यातून आपल्यासमोर मांडण्याचा ह्या अंकातून प्रयत्न आहे.

---


# संबंधित असणे

परस्परसंबंधांशिवाय अस्तित्व असत नाही. जगणे म्हणजेच संबंधित असणे... आपल्यापैकी बहुतेकांना हे लक्षात येत नाही - की हे जग म्हणजे माझे इतरांशी असलेले संबंध, मग ते एकाशी असोत की अनेकांशी. माझी समस्या नातेसंबंधांची आहे. जो काही मी आहे तेच मी प्रक्षेपित करतो आणि अर्थातच जर मी स्वत:ला समजून घेतले नाही तर संपूर्ण नातेसंबंध हे सतत विस्तारणाऱ्या संभ्रमाच्या चक्रात सापडतात. म्हणून परस्परसंबंध हे विलक्षण महत्त्वाचे ठरतात. तथाकथित समुदायाबरोबर, गर्दीबरोबर नव्हे, तर माझ्या कौटुंबिक विश्वामध्ये आणि मित्रांमध्ये - मग तो कितीही लहान गोतावळा असू दे - माझ्या पत्नीबरोबरचे माझे नातेसंबंध, माझ्या मुलाबरोबरचे, माझ्या शेजाऱ्याबरोबरचे, मोठमोठ्या संस्था, लोकांची प्रचंड जमवाजमव, मोठ्या चळवळी ह्या सगळ्यांनी बनलेल्या ह्या जगात, आपण लहान प्रमाणात कृती करायला घाबरतो; आपले स्वत:चे छोटे प्रश्न निस्तरणारी साधी माणसे व्हायला आपण घाबरतो. आपण स्वत:शीच म्हणतो, ''मी व्यक्तीश: काय करू शकतो? मी सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या चळवळीमध्ये सामील झाले पाहिजे'' याउलट, खरी क्रांती जमावाबरोबरच्या चळवळींमधून घडत नाही, तर अंतर्मनातून नातेसंबंधांच्या नव्याने केलेल्या मूल्यमापनाने होते. तीच फक्त खरी सुधारणा, सततची आमूलाग्र क्रांती. आपण लहान प्रमाणात सुरुवात करण्यास घाबरतो. कारण समस्याच एवढी अफाट आहे. आपल्याला वाटते की प्रचंड जनसमुदायानिशी, मोठ्या संस्थेसह, मोठ्या जमावाच्या चळवळीबरोबर आपण तिचा सामना केला पाहिजे. खरंच आपण लहान प्रमाणावर समस्या सोडविण्यापासून सुरुवात केली पाहिजे. आणि ते लहान प्रमाण म्हणजेच 'मी' आणि 'तुम्ही.' मी जेव्हा स्वत:ला समजून घेतो, तेव्हा मी तुम्हाला समजतो, आणि त्या आकलनामधून प्रेम येते. प्रेम हा घटक इथे निसटला आहे, नातेसंबंधामध्ये प्रीतीचा, ममत्वाचा, प्रेमाच्या ओलाव्याचा अभाव आहे. त्या प्रेमाला, हळूवारपणाला, उदात्ततेला, त्या परस्परसंबंधातील दयेला आपण वंचित झालो आहोत. म्हणूनच जमावाच्या चळवळीमध्ये आपण पळवाट शोधतो, ज्याने अधिक संभ्रम निर्माण होतो, अधिक दु:ख. जगाला सुधारण्याच्या आराखड्यांनी आपण आपले समाधान करून घेतो आणि त्या समस्या उकलणाऱ्या एकमेव घटकाकडे पाहत नाही, जे प्रेम-प्रीती आहे.

*द बुक ऑफ लाईफ - मार्च १९*

# परीक्षण

## जे. कृष्णमूर्ती यांच्या वॉशिंग्टन डि.सि. येथील १९८५ साली झालेल्या भाषणाची डिव्हीडी आता मराठी सबटायटल्स्‌सह उपलब्ध




जे. कृष्णमूर्ती यांची जगभर जी भाषणे झाली त्यात वॉशिंग्टन डि.सि. येथील एप्रिल १९८५ साली झालेली दोन भाषणे फार महत्त्वाची आहेत. या दोन भाषणांतून कृष्णजींनी आपल्या संपूर्ण शिकवणुकीचे सार सांगितलेले आहे. मानवी अस्तित्वाचे स्वरूप त्यांनी आपल्या जीवनप्रवासाच्या अखेरच्या वर्षात तळमळीने केलेल्या या दोन भाषणांमधून उलगडून दाखविले आहे.


कृष्णजींची सर्व शिकवण, जी ध्वनिमुद्रित किंवा चलतचित्ररुपाने सीडीज् आणि डिव्हीडीज् मध्ये आता उपलब्ध आहे ती इंग्रजी भाषेतूनच उपलब्ध आहे. परंतु अलिकडे या डिव्हीडीज् इंग्रजी, मराठी, गुजराती आणि इतर प्रादेशिक भाषांमधून सबटायटल्स् देऊन आपणा सर्वांसाठी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम फाउंडेशनने हाती घेतला आहे. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून वॉशिंग्टन डि.सि. १९८५ च्या या दोन महत्त्वाच्या डिव्हीडीज्‌ना मराठी सबटायटल्स् देण्यात आली आहेत.

कृष्णजींनी या भाषणातून त्यांच्या नेहमीच्या उत्कट तळमळीने माणसाला आज भेडसावणारे काही मूलभूत प्रश्न विचारले आहेत आणि त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

माणसाने आजचा अस्थिर आणि अस्वस्थ समाज का निर्माण केला ? माणूस आज ज्या गोष्टीला हात लावतो त्याची प्रचंड समस्या निर्माण करतो. का ? व्यक्तिगत संबंधामध्ये संघर्ष का निर्माण होतात? तुमचे देव आणि त्यांचे देव. तुमचा धर्म आणि त्यांचा धर्म. या सर्व संघर्षांचा शेवट करणे शक्य नाही का ? आपण जर संघर्षमुक्त झालो नाही तर या जगात कधीच शांती नांदणार नाही. समाज बदलण्याऐवजी माणसाला स्वत:लाच बदलायला पाहिजे आणि तीच खरी क्रांती आहे.

या व अशाच प्रकारच्या मूलभूत प्रश्नांचे विवेचन त्यांच्या अमोघ वाणीतून ऐकणे आपल्याला अंतर्मूख करू शकते.

ही प्रत्येक डिव्हीडी ९० मिनिटांची असून तिची किंमत प्रत्येकी रु. २५०/- आहे आणि ती मुंबई, सह्याद्री आणि इतर केंद्रांवर विक्रीसाठी उपलब्ध आहे.




---

## ब्रेल आवृत्त्या आणि ध्वनिमुद्रित पुस्तके

कृष्णमूर्तींच्या पुस्तकांचे जगभरातील अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. परंतु अजूनपर्यंत त्यांची शिकवण अंधांपर्यंत पोचू शकली नव्हती. या वर्षी कृष्णमूर्ती फाउंडेशनने हा नवीन उपक्रम हाती घेतला आहे. कृष्णमूर्तींच्या पुस्तकांच्या ब्रेललिपीमधील आवृत्त्या, तसेच त्यांच्यावरील चरित्रात्मक पुस्तकांची ध्वनिमुद्रित संस्करणे (audio books) प्रकाशित करण्याचा हा उपक्रम आहे. 'नॅब' *(National Association for the Blind)* ह्या संस्थेच्या सहभागाने हे कार्य केले जात आहे.

मूळ इंग्रजी पुस्तके आणि त्यांची मराठी, गुजराथी आणि हिंदीमधील अनुवादित पुस्तके ह्या उपक्रमांतर्गत ब्रेलमध्ये छापली जातील. 'नॅब' ह्या संस्थेमध्ये ब्रेलमुद्रणाची आधुनिक यंत्रणा आहे. भारतभरातील अंधांसाठी असलेल्या इतर संस्थांशी त्यांचे संपर्क असल्यामुळे ह्या प्रकल्पाचा फायदा शेकडो संस्थांना मिळणार आहे. 'नॅब' मधील वाचनालयातर्फे खास परवानगीने ध्वनिमुद्रित पुस्तकांच्या ध्वनिफिती देशभरातील अंध सदस्यांना विनामूल्य पाठविण्याची आणि परत मागविण्याची सोय आहे. त्यामुळे ध्वनिफितीच्या माध्यमातून कृष्णमूर्तींच्या शिकवणीची ओळख अंध बांधवांना होऊ शकेल.

इतर प्रादेशिक भाषांमधूनही ब्रेल आवृत्त्या काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. 'जॉन्सन् ॲन्ड जॉन्सन लि.' कंपनीची या प्रकल्पासाठी उदारहस्ते देणगी मिळाल्यामुळे ह्या महत्त्वाच्या कार्याच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात होणे शक्य झाले आहे.

### तुम्ही फक्त परस्परसंबंधामध्येच बहरता.

तर तुम्ही फक्त परस्परसंबंधामध्येच बहरता; फक्त प्रेमामध्येच उमलता, भांडणतंटयांमध्ये नाही. परंतु आमची हृदय कोमेजून गेली आहेत; आपण आपल्या मनाच्या विकल्पांनी आपली हृदये भरलेली आहेत. म्हणून दुसऱ्यांनी निर्माण केलेल्या गोष्टींनी आपली हृदये भरुन टाकण्यासाठी आपण त्यांच्यावर अवलंबून असतो. आपल्याजवळ प्रेम नसल्यामुळे आपण ते गुरूजवळ किंवा आणखी कोणाजवळ तरी शोधण्याचा प्रयत्न करतो. प्रेम हे शोधून मिळत नसते, ते तुम्ही विकत घेऊ शकत नाही. त्यासाठी तुम्ही स्वत:चा बळी देऊ शकत नाही. जेव्हा 'मी', 'स्व' नसतो त्याच वेळी प्रेम अस्तित्वात येते; आणि जोपर्यंत तुम्ही इच्छापूर्ती आणि पळवाटा शोधत असता, परस्परसंबंधातील गुंता समजून घेण्याचे नाकारता, तोपर्यंत तुम्ही केवळ 'मी' वरच जोर देत असता, आणि त्यामुळे प्रेमाला नाकारीत असता.

*द मिरर ऑफ रिलेशनशिप पृ. १२१*

# परस्परसंबधाच्या आरशातून तुम्हाला सत्य शोधायला हवे

कृष्णमूर्ती - समजा, काल माझ्या पत्नीने मला काही तरी सांगितले, टाकून बोलली, अपशब्द बोलली किंवा माझ्यावर खुषी दाखविली किंवा काहीतरी सुख देणारी गोष्ट केली इ. आणि विचाराने तिच्याविषयी मी एक प्रतिमा निर्माण केली. आणि मी त्या प्रतिमेप्रमाणे जगू लागलो किंवा तिने माझ्याविषयी तयार केलेल्या प्रतिमेप्रमाणे ती जगते, तेव्हा मी म्हणतो, विचार असे का करतो? इतक्यात उत्तर देऊ नका, दोन मिनिटे त्यासाठी द्या. तुमच्याजवळ त्याविषयी कल्पना नसतील तरच तुम्ही ते करू शकता. जर तुम्ही हे असे आहे, हे तसे आहे, अशी लगेच शब्दांकडे धाव घेतली नाहीत तरच. म्हणून आपण शोध घेतला पाहिजे की विचार असे का करतो? विचार असे करतो कारण प्रतिमांमध्ये त्याला सुरक्षितता मिळते. मी माझ्या पत्नीच्या प्रतिमेमध्ये सुरक्षित आहे. एक मिनिट थांबा, जरा हे ऐका, माझा देश, सुरक्षितता-बरोबर? माझा गट, सुरक्षितता, माझ्या गटाविषयी जी मी एक प्रतिमा तयार केली आहे, किंवा राष्ट्राविषयी किंवा धार्मिक संस्कारामधून मी निर्माण केलेली प्रतिमा- तो मग ख्रिस्त किंवा हिंदू देव, इ. असो. आणि तेव्हा विचार ह्या प्रतिमा निर्माण करतो, कारण त्यामध्ये त्याला सुरक्षितता मिळते. मग ती सुरक्षितता मेंदूमधील असंतुलन झाल्यामुळे असेल, असंतुलित श्रद्धा असतील, काहीतरी सुंदर आगळीवेगळी प्रतिमा असेल, तीच प्रक्रिया आहे. तेव्हा विचार सुरक्षितता शोधतो, त्याला सुरक्षितता पाहिजे. का?

प्रश्नकर्ता- मला असे वाटते की विचाराला स्वत:चे अस्तित्व टिकवायचे असते आणि विचार हा अनित्य आहे आणि म्हणून त्याला सुरक्षितता पाहिजे.

कृ.- ठीक आहे. पुढे जा सर, जरा पुढे जा. तिथे थांबू नका. तुम्ही काही तरी म्हणाला आहात. त्याचा शोध घ्या. त्याच्याबरोबर पुढे जा. तुम्ही काय म्हणता आहात त्याची खात्री आहे का? त्याचे सिद्धांत करू नका. तुम्ही जर वस्तुनिष्ठपणे बोलला नाही तर दुसऱ्या कशालाही अर्थ राहणार नाही.

प्र.- संरक्षण, सुरक्षितता आणि निश्चितता.

कृ. - म्हणजे काय? निश्चित असणे, सुरक्षित असणे, त्या सर्वांचा अर्थ संपूर्ण अभेद्य सुरक्षितता. एक मिनिट, का? का विचार त्याची मागणी करतो? पत्नीचे उदाहरण घेऊ, मी तिच्यावर मालकी दाखवितो, ती माझी आहे, त्यामध्ये मोठी निश्चितता आहे, सुरक्षितता. मी तिच्याबरोबर एकरूप झालो आहे, दोघांच्याही संमत्तीने, एकमेकांचे शोषण करीत. तो घाणेरडा शब्द वापरल्याबद्दल माफी मागतो. पण ती वस्तुस्थिती आहे. म्हणून मी माझ्याशीच म्हणतो की, विचार सुरक्षितता मागतो, परंतु प्रतिमेमध्ये सुरक्षितता आहे का? मी पत्नीमध्ये किंवा मैत्रिणीमध्ये सुरक्षितता शोधतो, आणि मी त्यांच्या विषयी प्रतिमा निर्माण केली आणि त्या प्रतिमेमध्ये मी सुरक्षितता मानली. परंतु ती प्रतिमा आहे. तुम्हाला समजलं का? तो शब्द आहे, स्मृती, इतकी चंचल गोष्ट परंतु मी तिलाच पकडून राहतो.

प्र.- सर, मी धावणाऱ्या या काळाविषयी जागरूक आहे आणि मला भीती वाटते की त्याचा अंत होणार आहे. म्हणून मी ज्या प्रतिमा निर्माण करतो त्यामध्ये नित्यता शोधतो.

कृ.- नित्यता कशामध्येही शोधली जाते. म्हणून मी विचारतो आहे की, विचार का शोधतो? त्याकडे जरा लक्ष द्या. मी पारंपारिक प्रतिमांमध्ये सुरक्षितता शोधतो, क्रॉसमध्ये शोधतो, मी त्यामध्ये सुरक्षितता शोधतो, क्रॉस, त्याची संपूर्ण रचना, त्याच्यामागे असलेली सर्व कर्मकांडे, धार्मिक मते, सर्व काही, मला त्यामध्ये सुरक्षितता मिळते का? आणि मी ते तर्काने जाणतो. मी जरा खरोखरच भानावर असलो तर, तर्काने जाणतो की ती विचाराची निर्मिती आहे आणि तरीसुद्धा विचार त्यालाच पकडून ठेवतो. का?

प्र. - संस्कार.

कृ.- संस्कारांचा तो भाग आहे? लहानपणापासून प्रतिमांवर विश्वास ठेवण्याच्या केलेल्या संस्काराचा भाग म्हणून - राम, कृष्ण, किंवा ख्रिस्त. का? विचार त्यामध्ये सुरक्षितता पाहतो. तरीसुद्धा जेव्हा विचार त्याकडे पाहातो, तेव्हा, मी म्हणतो, अरे देवा तिथे सुरक्षितता नाही आहे - ती एक फक्त कल्पना आहे, जी विचाराने निर्माण केली आहे. म्हणून जेव्हा विचार त्या प्रतिमेला पकडून ठेवतो तेव्हा तो अगदी मनोविकृतीचा कळस असतो. मला माहीत आहे की ते धोकादायक आहे. आणि तरीसुद्धा मी त्याला पकडून ठेवतो. तुम्हाला यातला मूर्खपणा दिसतो आहे का?... तुम्ही प्रत्यक्षपणे तो मूर्खपणा पाहत आहात?


प्र. - होय - मी पाहातोय.

कृ. - मग तोच त्याचा शेवट आहे. मग तुम्ही प्रतिमा निर्माण करणार नाही. परंतु थांबा. जर बायकोने मला मूर्ख म्हटले, तर मी प्रतिमा न करता तिला ऐकू शकेन का? किंवा पूर्वीच्या परंपरेप्रमाणे, सवयीप्रमाणे, संस्काराप्रमाणे, प्रतिमा तयार करण्याची प्रतिक्रिया? तुम्हाला कळतंय का? ती मला मूर्ख म्हणते, परंतु तिथे प्रतिमा करणे नाही. ते शक्य आहे का? किंवा ती माझी स्तुती करते, ज्याचा अर्थ तोच आहे. नाण्याची दुसरी बाजू. आपण ते पाहुया का? म्हणजे माझी पत्नी मला मूर्ख म्हणते कारण मी जे काहीतरी बडबडलो किंवा केले ते तिला आवडले नाही. विचार हा संस्कारित आहे तेव्हा लगेच प्रतिसाद म्हणजे प्रतिमा. मी मूर्ख नाहीये. प्रतिमा तयार होते. आता मी तिला ऐकू शकतो का? कृपया शोधा मी तिला त्या प्रतिसादाविना ऐकू शकतो का? याचा अर्थ असा नव्हे, की मी बेपर्वा होतो. जेव्हा ती म्हणते की, 'प्रियकरा, तू किती सुंदर आहेस.' जी दुसरी प्रतिमा आहे. तर मी तिला ऐकू शकतो का? दोन्ही वेळा, ज्यावेळी ती मला मूर्ख म्हणते आणि ज्यावेळी सुंदर म्हणते तेव्हा ते मनात न ठेवता, मेंदूमध्ये नोंद न घेता तिला ऐकू शकतो का? तुम्हाला माझा प्रश्न समजतोय ना? ते फार महत्त्वाचे आहे. यामध्ये अजून थोडे पुढे जाऊया. मेंदूचे काम आहे नोंद करणे. बरोबर? तो नोंद करीत असतो आणि तो इतका संस्कारित आहे की ताबडतोब तो 'मूर्ख' म्हटल्यानंतर त्याची नोंद करतो, किंवा ती जेव्हा म्हणते की, मी किती 'सुंदर' आहे, तेव्हा सुंदर हा शब्द नोंद केला जातो. आता जेव्हा ती मला मूर्ख म्हणते किंवा सुंदर म्हणते तेव्हा नोंद न घेणे शक्य आहे का? याचा अर्थ असा नव्हे की मी बेपर्वा होतो. रुक्ष किंवा बेजबाबदार. आता मी ते करू शकतो - कृपया ऐका. मी नोंद करू शकत नाही, तेव्हाच ते शक्य आहे - जेव्हा ती जे काय म्हणते त्याकडे मी संपूर्ण लक्ष देऊन ऐकतो तेव्हा नोंद होत नाही.

तुम्ही ते कृपया आता करा, जेव्हा तिथे बसलेले आहात तेव्हाच. मी असे दाखवून देत आहे की, प्रतिमा तयार करणे ही विचाराची प्रक्रिया आहे. विचाराने प्रतिमा तयार केली आहे, म्हणून त्यामध्ये संघर्ष आहे आणि मी त्या संघर्षामध्ये प्रचंड धोका पाहतो आहे. मग तो म्हणून मी विचारतो की ते प्रतिमा बनविणे थांबविता येईल का? विचार या प्रतिमा का तयार करतो? त्याला या प्रतिमांमध्ये संरक्षण सुरक्षितता मिळते आणि जरी विचाराला माहीत आहे की हे किती मूर्खपणाचे आहे आणि तरीसुद्धा विचार जेव्हा अशा अयोग्य, असमंजस गोष्टींना पकडून ठेवतो, तेव्हा तो मानसिकदृष्ट्या दुबळा होतो.

*'टु बी ह्यूमन'* मधून

# मराठी शिबीर




कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री येथे २२-२७ मे, २००८ या काळात मराठी शिबीर भरले होते. विषय होता - *परिवर्तनशील ध्यान.*

सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये वसलेल्या निसर्गरम्य परिसरातील हे अध्ययन केंद्र. दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या या संमेलनात यंदा महाराष्ट्रातून सुमारे १५० शिबिरार्थी आले होते. अन्य भाषिकांमधूनही काही शिबिरार्थी आले होते. जीवनाचा गंभीरपणे विचार करण्याची अत्यंत गरज असणाऱ्या ह्या मानवी इतिहासातील बिकट काळात या शिबिराला बहुसंख्य लोकांची उपस्थिती हा आशेचा किरण आहे.

सर्वसाधारणपणे शिबिराचा कार्यक्रम असा होता - सकाळी योगासने आणि प्राणायाम शिकून घेण्याची व्यवस्था. कार्यक्रमात प्रथम कृष्णजींच्या व्याख्यानाची विषयाशी निगडीत ध्वनिचित्रफित, त्यानंतर व्याख्यान व प्रश्नोत्तरे, दुपारी गटचर्चा आणि संध्याकाळी मुक्त फिरणे.

व्याख्यानाचे विषय शिबिराच्या विषयाशी सुसंगत परंतु वेगवेगळे होते. पहिल्या दिवसाचे भाषण डॉ. माधव कृष्ण कोल्हटकर, पुणे यांचे - विषय 'वैद्यकीय दृष्टीकोनातून ध्यानाची प्रक्रिया.' त्यांनी मानवी मेंदूची रचना व उत्क्रांती यासंबंधी माहिती देऊन ध्यानाशी त्याचा कसा संबंध असू शकेल हे स्पष्ट केले.

दुसऱ्या दिवशी श्री. किशोर खैरनार यांचे शिबिराचा मूळ विषय 'परिवर्तनशील ध्यान' ह्यावर व्याख्यान झाले. मुद्देसूदपणे विषयाची मांडणी करीत मानवात परिवर्तन घडून येण्याची गरज आणि त्याचा ध्यानाशी असलेला संबंध त्यांनी दाखवून दिला. कृष्णमूर्तींच्या दृष्टीकोनातून - ध्यानातूनच कसे परिवर्तन घडून येते याचे त्यांनी विस्तृत विवेचन केले. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांमधून शिबिरार्थींना ह्या गहन विषयाबद्दल भासणाऱ्या समस्यांची उकल होण्यास मदत झाली.

दररोज कृष्णजींच्या प्रवचनाच्या ध्वनिचित्रफिती इंग्रजीत दाखविण्यापूर्वी त्यातील आशय श्री. किशोर खैरनार थोडक्यात मराठीत समजावून सांगत असत. त्यामुळे शिबिरार्थींना प्रवचनामधील विषय मांडणीचा संदर्भ मिळून प्रवचनांचे अधिक आकलन होण्यास निश्चितच मदत झाली.

संध्याकाळच्या गटचर्चांमध्ये इतर भाषिकांसाठी एक गट इंग्रजीतही आयोजित करण्यात आला होता. रोजच्या धकाधकीतून वेळ काढून जीवनाकडे अधिक गहनतेने पाहण्यासाठी उत्सुक असलेल्या शिबिरार्थींना ह्या गटचर्चांमधून आपापले विचार आणि समस्या मांडण्याची संधी मिळाली. एकमेकांशी संवाद साधला गेला.

तिसऱ्या दिवशी डॉ. सतीश इनामदार यांचे व्याख्यान झाले. विषय - 'जे. कृष्णमूर्तींनी सांगितलेले ध्यान'. कृष्णमूर्ती ध्यानासंबंधी पारंपारिक अर्थाहून भिन्न, परंतु दैनंदिन जीवनाशी निगडीत असा अर्थ सांगतात. त्यांच्या दृष्टीने 'स्वबोधा'ला, म्हणजेच स्वत:ला जाणून घेण्याच्या प्रक्रियेला ध्यान म्हणतात. त्यासाठी मन सदैव तरल, सतर्क, सजग अवधानी असायला लागते. क्षणोक्षणी, 'जसे आपण आहोत तसे' पाहण्याला, म्हणजे द्वंद्वाच्या पलिकडे जाण्याच्या प्रक्रियेला कृष्णजींनी ध्यान म्हटले आहे, हे समजावून सांगताना डॉ. इनामदारांनी शांत मनाच्या सृजनशील आंतरिक स्वातंत्र्याचे विवेचन करून कृष्णमूर्तींना अभिप्रेत असलेल्या ध्यानाची उकल दोन पावले पुढे नेली. भाषणानंतर ज्या पद्धतीने अर्थपूर्ण प्रश्नोत्तरे झाली त्यातून ध्यान या विषयावरचे एक आगळे वेगळे आकलन झाल्याचे जाणवू लागले.

शिबिराच्या चौथ्या आणि शेवटच्या दिवशी एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. विषय होता - 'कृष्णमूर्तींची शिकवण नेमकी काय आहे.' सुरुवातीला पॅनेल सभासदांनी या विषयावर चर्चा केली आणि नंतर सर्व शिबिरार्थींबरोबर चर्चा पुढे चालू राहिली. सुरुवातीला शिबिरात झालेल्या एकूण अध्ययनाचा गोषवारा घेतला गेला. 'शिबिरात सहभागी झाल्यानंतरही कृष्णमूर्तींना अभिप्रेत असलेले ध्यान कदाचित पूर्णपणे उमजू शकणार नाही' या मुद्याचे प्रतिपादन केले गेले. कृष्णमूर्तींच्या शिकवणीच्या आगळ्या स्वरूपामध्ये 'कुठलाही प्रश्न चटकन निर्णायकपणे न सोडविता प्रश्नाकडेच खोलवर पण मोघमपणे पाहणे', ह्यात तयार उत्तरे न मिळाल्याने 'तशी' सवय असलेले मन कसे गोंधळते त्याबद्दल विवेचन झाले. कृष्णमूर्तींची शिकवण ही एक आरसा असून त्यात आपण स्वत:ला आपल्या कल्पनारंजित प्रतिमेनुसार नव्हे तर 'जसे आहोत तसे' स्पष्टपणे पाहतो हे दाखवून दिले गेले. जुन्या स्मृती, अनुभव, भविष्यकाळाची चिंता यांचा पगडा असलेल्या मनातून जीवनाकडे न बघता कृष्णमूर्तींनी सांगितल्याप्रमाणे वर्तमान क्षणाच्या वास्तवाकडे बघण्याचा प्रयत्न करण्याकडे लक्ष वेधले. चर्चेची सांगता करताना कालातीत अशा धार्मिक मनाचे विवेचन केले गेले.

शेवटच्या दिवशीच्या ध्वनिचित्रफितीत कृष्णाजींच्या अगदी सुरुवातीच्या काळातील दुर्मिळ चित्रणे दाखविली गेली. शिबिराच्या या शेवटच्या दिवसापर्यंत सर्वांमध्ये एक आगळे वेगळे प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. भारावलेल्या वातावरणात सगळ्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

शिबिराची अतिशय पद्धतशीर कार्यव्यवस्था आणि साऱ्या सोयींचा नीट केला गेलेला विचार याबद्दल सर्वांनी श्री. किशोर खैरनार आणि श्रीमती कल्याणी किशोर ह्यांचे मन:पूर्वक आभार मानले.

'अंतरलहरी' या कृष्णमूर्तींच्या शिकवणीवर आधारित सुरू केलेल्या मराठी वृत्तपत्रिकेचे प्रकाशन याच शिबिरात झाले. आणि सर्वांनी या पत्रिकेचे मनापासून स्वागत केले.

# जीवन म्हणजे परस्पर संबंधामधील जगणे

परस्पर संबंध म्हणजे एक आरसा आहे. ज्यामध्ये आपण जसे आहोत तसेच स्वत:ला पाहतो. सगळं जीवन म्हणजे परस्पर संबंधांमध्ये जगणे. या भूतलावर अशी कोणतीही सचेतन वस्तू नाही जी कशाना कशाशी संबंधित नाही. संन्यासीसुद्धा जेव्हा दूर एका एकाकी ठिकाणी जातो, तेव्हा तो भूतकाळाशी निगडीत असतो, तो त्याच्या सभोवती असलेल्या माणसांशी संबंधित असतो. परस्पर संबंधांपासून सुटका नाही. त्या संबंधांमध्ये, जो आरसा आहे, त्यामध्ये आपण स्वत:ला पाहू शकतो. आपण स्वत: कसे आहोत त्याचे दर्शन करू शकतो, आपल्या प्रतिक्रिया, आपले पूर्वग्रह, आपले भय, औदासिन्य, काळज्या, एकाकीपणा, दु:ख, वेदना, शोक. आपण खरोखरच प्रेम करतो की आपल्यामध्ये प्रेम नावाची गोष्ट नाहीच आहे. याचा पण शोध घेऊ शकतो. तेव्हा परस्पर संबंधाच्या प्रश्नासंबंधी आपण मागोवा घेऊ कारण तोच प्रेमाचा आधार आहे, आपल्याला एकमेकांबरोबर आता तीच एक गोष्ट आहे. जर तुम्ही योग्य संबंध निर्माण केले नाहीत, जर तुम्ही तुमचे स्वत:चे ठराविक संकुचित जीवन जगत राहिलात, नवरा, बायको वगैरेंना सोडून तर ते एकाकी अस्तित्व - जीवनच स्वत:च्या विनाशाला कारणीभूत होईल.

परस्पर संबंध ही जीवनामध्ये एक असामान्य महत्त्वाची गोष्ट आहे. जर आपण ते संबंध समजून घेतले नाहीत, तर आपल्याला नवीन समाजाची निर्मिती करता येणार नाही. आपण परस्पर संबंध म्हणजे काय याचा अत्यंत बारकाईने शोध घेणार आहोत - मानवाने जीवनाच्या या प्रदीर्घ अस्तित्वामध्ये कधीच असे परस्पर संबंध अनुभवले नाहीत की ज्यामध्ये दडपण नाही, स्वामित्व नाही, आसक्ती नाही, विरोधाभास नाही इ. इ. त्यामध्ये 'पुरुष-स्त्री', आम्ही-ते' असे कायमचे विभाजन का आहे ? आपण मिळून याचा शोध घेणार आहोत. ही आत्मपरीक्षा बौद्धिक किंवा केवळ शाब्दिक असू शकेल. परंतु अशा बौद्धिक आकलनाला मुळीच किंमत नाही. ती फक्त एक कल्पना असते, एक फक्त संकल्पना. परंतु तुम्ही जर या परस्पर संबंधाच्या संपूर्ण प्रक्रियेकडे पाहिले, तर कदाचित त्यातील गहनता आणि सौंदर्य तुम्ही पाहू शकाल आणि त्या संबंधामधील गुणवत्ता, बरोबर ? आपण पुढे जाऊया का ? आपण विचारीत आहोत की, सध्या आपले एकमेकांबरोबर काय संबंध आहेत ? स्वप्नरंजनात्मक नव्हे, आदर्शवादी नव्हेत, सैद्धांतिक नव्हे, जे सगळे खोटे आहेत, परंतु वस्तुत: प्रतिदिनीचे पुरुष - स्त्रियांचे एकमेकांबरोबरचे संबंध, आपण खरोखरच संबंधित आहोत का ? एका स्तरावर शारीरिक संबंध आहेत. आपली नाती लैंगिक संबंधाची आहेत, सुख देणारी, आपले संबंध स्वामित्ववादी, आसक्तीपूर्ण, एकमेकांवर निरनिराळ्या प्रकारचे आक्रमण लादले जाणारे आहेत.

आसक्ती म्हणजे काय ? अशी आसक्ती असण्याची आपल्याला एवढी प्रचंड गरजच का आहे ? या आसक्तीमध्ये काय सूचित आहे? का आपण जखडलेले असतो ? जेव्हा तुम्ही कोणाला तरी जोडलेले, आसक्त झालेले असता तेव्हा नेहमीच भीती असते, ते हरवण्याची भीती, कायम असुरक्षिततेची भावना असते. तिचे तुम्ही स्वत: कृपया निरीक्षण करा. तेथे विलगतेची भावना नेहमी असते. मी माझ्या पत्नीशी आसक्त आहे. मी तिच्याशी जखडलेला आहे कारण ती मला शारिरीक सुख देते, जोडीदार म्हणून सुख देते, हे सर्व काही तुम्हाला माहीत आहे. मी सांगण्याची गरज नाही. तेव्हा मी तिच्याशी जोडलेला आहे. याचाच अर्थ असा की मी मत्सरी आहे, घाबरलेला आहे. जिथे मत्सर आहे, तिथे द्वेष आहे आणि आसक्ती असेल तिथे प्रेम असते का ? आपल्या परस्पर संबंधामध्ये हा एक मुद्दा आपण लक्षात घेतला पाहिजे.

जेव्हा आपल्या परस्पर संबंधामध्ये प्रत्येकाने अनेक वर्षे दुसऱ्या विषयींच्या प्रतिमा जमा केल्या आहेत, तिने आणि त्याने एकमेकांविषयी ज्या प्रतिमा निर्माण केल्या आहेत तेच वास्तविकत: संबंध झाले आहेत. ते एकमेकांची शैय्यासोबत करीत असतील परंतु वस्तुस्थिती अशी आहे की तिने आणि त्याने एकमेकाविषयी प्रतिमा निर्माण केल्या आहेत. आणि त्या प्रतिमांच्या परस्पर संबंधामध्ये. (त्या दोघांमध्ये.) कसे काय प्रत्यक्ष, वस्तुत: संबंध राहू शकतील ? आपण सर्वांनी लहानपणापासून आपल्याबद्दल आणि इतरांबद्दल प्रतिमा निर्माण केल्या आहेत. आपण एक फार फार गंभीर प्रश्न विचारीत आहोत - आपण एकाही प्रतिमेशिवाय जगू शकतो का ? तुम्हा सर्वांना वक्त्यांविषयी नक्कीच प्रतिमा आहे, नाही का? अर्थातच आहेत. का ? तुम्हाला वक्ता खरोखरच माहीत नाही. वस्तुत: तुम्हाला माहीत नाही. तो व्यासपीठावर बसतो, बोलतो, परंतु तुमचे त्याच्याबरोबर नाते नाही. कारण तुमच्या मनात त्याच्याविषयी प्रतिमा आहे. तुम्ही त्याच्याविषयी प्रतिमा निर्माण केली आहे आणि तुमच्याजवळ तुमची स्वत:बद्दलची प्रतिमा आहे. तुमच्या जवळ राजकारण्याबद्दल, व्यापारी वर्गाबद्दल, गुरुविषयी, ह्या ना त्या विषयी अनेक प्रतिमा जमा झाल्या आहेत. आपण एकाही प्रतिमेशिवाय गंभीरपणे जगू शकू का ? प्रतिमा ही आपल्या बायकोबद्दलचे मत असू शकेल, प्रतिमा हे एक लैंगिक चित्र असू शकेल, प्रतिमा ही एक अधिक चांगल्या संबंधाविषयी कल्पना असू शकेल. इ. इ. मनुष्याला प्रतिमा मुळात येतातच का ? कृपया हा प्रश्न आपण स्वत:ला विचारा. जेव्हा दुसऱ्याविषयी आपल्याजवळ प्रतिमा असते तेव्हा ती प्रतिमा एक सुरक्षिततेची भावना निर्माण करते.

*माइंड विदाउट मेझर* मधून पृ. ७९-८०

---

## वार्षिक संमेलन

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियातर्फे दरवर्षी भरणारे वार्षिक संमेलन या वर्षी १८ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर २००८ या काळात कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री येथे भरणार आहे. Man Nature Relationship (मानवाचे निसर्गाशी नाते) हा या संमेलनाच्या विषय आहे. ज्यांना या संमेलनात सहभागी व्हायचे आहे त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री,
पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर),
जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २८४३४६

- ईमेल : kscskfi@gmail.com
- वेबसाईट : http://www.kscskfi.com

## तुम्ही प्रेमात पडूनही त्या नात्यामध्ये स्वामित्त्वाची भावना न आणता राहू शकता का?

**प्रश्नकर्ता:** पुरुष आणि स्त्रीला एकत्र राहणे, शारीरिक संबंध ठेवणे, मुलं होणे आणि तरी देखील अशा नात्यामध्ये असणारी भांडणे, कडवटपणा आणि संघर्षाशिवाय जगता येणे शक्य आहे का? दोन्ही बाजूनां स्वातंत्र्य असणं शक्य आहे का ? स्वातंत्र्य म्हणजे मला असं म्हणायचं नाही की नवऱ्याला किंवा बायकोला नेहमीच कुणा इतराशी प्रकरण करण्याचं स्वातंत्र्य असावं. माणसं सर्वसाधारणपणे एकत्र येतात आणि प्रेमात पडतात म्हणून लग्न करतात, आणि त्यात अभिलाषा असते, निवड, सूख, स्वमित्वाची भावना असते, आणि प्रचंड आवेग असतो. ह्या सर्व 'प्रेमात असण्या'चे स्वरुप सुरुवातीपासूनच संघर्षाचे बीज घेऊन असतं.

**कृष्णमूर्ती :** खरचं का? असं असण्याची गरज आहे का? मला खरं तर हे फारसं पटत नाही. तुम्ही प्रेमात पडूनही त्या नात्यामध्ये स्वामित्वाची भावना न आणता राहू शकता का? मी कुणावर तरी प्रेम करतो आणि ती माझ्यावर प्रेम करते आणि आम्ही लग्न करतो. ते अगदी साधं सरळ आहे, त्यामध्ये संघर्ष नाहीच मुळी. (जेव्हा मी म्हणतो की आम्ही लग्न करतो तेव्हा मी असंही म्हणू शकतो की आम्ही एकत्र रहाण्याचं ठरवतो - शब्दांमध्ये आपण अडकुया नको.) आपल्याकडे दुसरी गोष्ट शेपटीसारखी मागोमाग येत असल्याशिवाय पहिली गोष्ट असूच शकत नाही का? प्रेमात पडलेली दोन माणसं जर इतकी प्रगल्भ आणि संवेदनशील असतील तर तिथे स्वातंत्र्य असेल आणि संघर्ष निर्माण करणाऱ्या त्या केंद्राचा अभाव असेल, असं नाही का असू शकत? संघर्ष हा प्रेमाच्या भावनेमध्ये नसतो; प्रेमामध्ये असणे हे पूर्णपणे संघर्षाशिवाय असतं. प्रेम करण्यामध्ये ऊर्जेचा व्यय होत नाही. उर्जेचा क्षय हा त्या शेपटीमध्ये असतो, जे त्यानंतर घडते त्या सगळयामध्ये -हेवा, स्वामित्वाचा अधिकार, संशय, शंका, प्रेमभंग होण्याची भीती, सतत प्रेमाची खात्री करुन घेण्याची आणि सुरक्षिततेची मागणी. खरचं, ज्याच्यावर तुम्ही प्रेम करता त्याच्याबरोबर शारिरीक संबंध ठेऊन जगणं शक्य आहे, त्यानंतर येणाऱ्या दु:खाच्या झंझावाताशिवाय. अर्थातच ते शक्य आहे.

*द मिरर ऑफ रिलेशनशिप* पृ. १०३

## कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया

### जे. कृष्णमूर्ती यांची मराठीतील भाषांतरित उपलब्ध पुस्तके

| क्र. | पुस्तकाचे नाव |
|---|---|
| १. | ज्ञातापासून मुक्ती |
| २. | प्रथम अर्थात अंतिम मुक्ती |
| ३. | शिक्षण जीवन रहस्य |
| ४. | हिंसावृत्तीच्या पलीकडे |
| ५. | जीवनभाष्ये खंड - १ |
| ६. | जीवनभाष्ये खंड - २ |
| ७. | जीवनभाष्ये खंड - ३ |
| ८. | दैनंदिनी |
| ९. | परंपरा आणि परिवर्तन |
| १०. | एकमेव परिवर्तन |
| ११. | कृष्णमूर्तींचा स्वत:शी संवाद |
| १२. | कृष्णमूर्तींची रोजनिशी |
| १३. | कालाचा अंत |
| १४. | भावी जीवन |
| १५. | तुम्ही जेथे आहात तेथे ती कृपा आहे |
| १६. | परस्परसंबंध |
| १७. | आपल्या अस्तित्वाचे स्वरूप |
| १८. | अंतरंगातील बहर आणि एक स्वगत संभाषण |
| १९. | संघर्षमुक्त जीवन |
| २०. | तेरा संवाद |
| २१. | जे. कृष्णमूर्ती - एक परिचय |
| २२. | मानवतेचे भवितव्य |
| २३. | बिनशर्त मुक्तता |
| २४. | जीवन पुस्तक |
| २५. | जगण्यासाठी चार ओळी |
| २६. | शिकवणीचा गाभा |
| २७. | आत्मबोध म्हणजे काय ? |
| २८. | दु:खाचा अंत |
| २९. | मृत्यूबरोबर जगणे |
| ३०. | श्रीलंकेतील भाषणे - १९८० |

### कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री (KFI) येथील विशेष अध्ययन कार्यशाळा

| | | | |
|---|---|---|---|
| १० ते १६ ऑक्टोबर २००८ | Virtue is not imitation, Virtue is creative living | २ ते ६ नोव्हेंबर २००८ | दु:खाचा अंत आत्मबोधाने होतो |
| २४ ते ३० डिसेंबर २००८ | The Art of Living is to have no fear, no sorrow | १२ ते १६ जानेवारी २००८ | To live with Death requires a great deal of enquiry |

**संपर्कासाठी पत्ता :** संचालक, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री, पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २८४३४६ • ईमेल - kscskfi@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

### आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर येथील विशेष अध्ययन कार्यशाळा

| | | | |
|---|---|---|---|
| ११-१२ ऑक्टोबर २००८ | Love & Pleasure | ८-९ नोव्हेंबर २००८ | Fear, Desire |
| १३-१४ डिसेंबर २००८ | Death | १०-११ जानेवारी २००९ | Be your own Teacher |

**संपर्कासाठी पत्ता :** संपर्कासाठी पत्ता :- आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र, दूरध्वनी : ९८२२३४७४५४, (०२२) २५१५३०९४, २४२२३१९९ • ई मेल : zilog@vsnl.com

## आगामी कार्यक्रम

येत्या ऑक्टोबरमध्ये मुंबईच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (रविंद्र नाट्य मंदिर), प्रभादेवी येथे कृष्णमूर्ती फाऊंडेशन इंडियाच्या वसंत विहार, चेन्नई येथील मुख्य कार्यालयातर्फे दोन दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

**The man, The Message, And You**
**व्यक्ती, संदेश, आणि तुम्ही**

ह्या कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल.

**दि. १८, १९ ऑक्टोबर २००८**
**सकाळी १० ते सायंकाळी ७**

- कृष्णमूर्तींचे जीवन आणि त्यांची शिकवण यावर आधारित छायाचित्रांचे प्रदर्शन.

- कृष्णमूर्तींच्या शिकवणीतील काही निवडक विषयवार उताऱ्यांवर आधारित ध्वनिचित्रफितीतील भाग संगणकावर पाहण्याची सोय.

- कृष्णमूर्तींची पुस्तके, सीडीज्, डिव्हीडीज्ची विक्री

**दि. १८ ऑक्टोबर २००८**
**सकाळी ११.३० ते १.००**

- कृष्णमूर्तींची शिक्षणाविषयी दृष्टी : मराठी आणि इंग्रजीतून संवाद

**दुपारी २.३० ते सायंकाळी ६.३०**

- 'परिवर्तनाचे आव्हान' *The Challenge of change* ह्या कृष्णमूर्तींवरील चरित्रात्मक माहितीपटाचे मराठी (dubbing) संस्करण.

- कृष्णमूर्तींच्या जीवनावर आधारित अरविंदन् या प्रख्यात कलादिग्दर्शकाने बनविलेला माहितीपट *The Seer who Walks Alone*

**दि. १९ ऑक्टोबर २००८**
**सकाळी १० - दुपारी १**

- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे महासचिव श्री. एस्. पी. कंदास्वामी यांचे उद्घाटनपर भाषण

- श्री. रणजीत होसकोटे यांचे व्याख्यान. विषय - Contemporary Relevance of Krishnamurti's Teachings. (कृष्णमूर्तींच्या शिकवणीची आजच्या काळातील समर्पकता)

- श्री. नंदन निलेकानी (इनफोसिस) यांचे व्याख्यान. विषय- Social Responsibility (सामाजिक जबाबदारी)

- कृष्णमूर्तींच्या इंग्रजी पुस्तकांच्या तसेच मराठी, हिंदी आणि गुजरातीतील अनुवादित पुस्तकांच्या ब्रेल आवृत्त्यांचे श्री. रमण शंकर (नॅब) यांच्या हस्ते प्रकाशन.

- कृष्णमूर्तींच्या मूळ इंग्रजी प्रवचनाची ध्वनिचित्रफीत *What is the Future of Humanity?*

**या दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमांसाठी सर्वांना आवर्जून आमंत्रण आहे.**

## तुम्ही आणि मी हेच समस्या आहोत, जग नव्हे

जग हे तुम्हाआम्हापेक्षा वेगळे असे काही नाही, आपण जे एकमेकांशी नाते जोडतो किंवा जोडण्याचा प्रयत्न करतो ते नातेसंबंध म्हणजेच समाज आहे, जग आहे. तेव्हा तुम्ही आणि मी हेच समस्या आहोत. कारण जग म्हणज आपलेच प्रक्षेपण, आणि जगाला समजून घेण्यासाठी आपण स्वत:ला समजून घेतले पाहिजे. जग आपल्यापासून भिन्न नाही; आपणच विश्व आहोत, आणि आपल्या समस्या ह्याच विश्वाच्या समस्या आहेत.

***द बुक ऑफ लाईफ* - मार्च २०**

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस् :**

http://jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क :-** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल, मुंबई-४००००६.
दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*